# १६

## श्रीसमर्थ-चरित्र

## पोवाडा.

रामदास सद्‌गुरूराया ! । धन्य तव माया। धर्म रक्षाया। घेतला महाराष्ट्रीं अवतार । कंठीं धरियेला कीर्तिचा हार । पोवाडा **पांडुरंग** गाणार ॥ ध्रु० ॥

—: १ :—

**गेला** धर्म पार विलयाला । अधर्म जगीं आला। आचार नष्ट झाला । हिंदुनीं सोडला सारा अभिमान । मान यवनाच्या हातीं, तरी मान । घालि मनामधीं मोठा थयमान ! ॥ देवतांची मूर्ति भंगली । पायीं तुडविली ॥ छिन्नभिन्न केली। कितिक जळामधीं झाल्या साऱ्या गार । वरती यवनांची चमके तलवार।





देवळं किती भंगली नाहीं पारावार ॥ हंबरडा फोडे किती गाय । विश्वाची माय । करिते 'हाय ! हाय !'। दीनवाणी झाली, नुरला आधार । दीनदुबळा झाला हिंदु सरदार। नष्ट कितिकांचें झालें घरदार ! ॥ यवनांनीं मांडला अनाचार । करति बलात्कार । झाली कारागार । घर कसलीं ? झाला जीव बेजार। धैर्य गेलं आली मोहाची तार। झाला अभिमान हाय ! पुरा ठार ! ! ॥ चाल ॥ ब्राह्मणानीं सोडला आचार झाला ज्ञानहीन ॥ क्षत्रियांनीं लठेपणा दिला आपला तो दान ॥ दोघांनीं सोडलं धर्माला, करति सुरापान ॥ भांग गांजा तंबाकू यांचं नित्य सेवन । पोटासाठीं करती म्लेंच्छांचा मोठा सन्मान ॥ झाला दीन, मूढ विसरला सारं देहभान ! ॥ चाल ॥ अशि दशा दीन देशाला । हाय ! आली; मोठा हा घाला ! ॥ जगण्याचा भरवंसा गेला ! । उद्यां काय ? नकळे कोणाला ॥ चाल ॥ असा धर्म सारा लोपला । यवनांनीं हैराण केला । त्राहि त्राहि केलं लोकाला । तीर्थांचा व्याप संपला । किती बायका जपती अन्नला । सुळसुळाट दैत्यांचा झाला । वेदांचा संहार केला !। अवकळा आलि भाषेला ॥ चाल ॥ धर्माचा करण्या उद्धार । झाला अवतार । आला यतिवर । म्हणति जन **रामदास** चिरकाळ ! । रामाचा दास, काळाचा काळ ! । शुभ्र कीर्तिनं घातली माळ ॥ १ ॥

—: २ :—

शके पंधराशें तीस सालाला झाला महिवर अवतार ।
ठोसर कुळिं सूर्याजिपंत ते, धन्य जाहले घरदार ! ॥
**नारायण** मग नांव ठेविलं, रूप मनोहर सुकुमार ।
पाहुनिया हे बाळ सकळजन झाले मनिं गारेगार ! ! ॥
बाळपणिंच वनवास आवडे येइ जगाचा तिटकारा ! ।
गिरिकुहरांतुन बसुन लपुन रघुराजपदाचा घे थारा ! ॥
बारा वर्षांचं बाळ जाहलं विवाह ठरला मग त्याचा ।
'सावधान' रव ऐकुन झाला सावधान तो कायमचा ! ॥
॥ चाल ॥ घर सोडुन गेला मग टांकळीस तो बाळ ॥ बारा वर्ष केलं तप, झाला काळाचा काळ ॥ ऋद्धि सिद्धि रामदासाला घालती माळ ! ॥ मग केलं तीर्थाटण, बारा वर्षांचा काळ ॥
॥ चाल ॥ देश वेश पाहुनी पारखुन लोक, लागली मग चिंता। महाराष्ट्रभूमिची घोर, करुणा कधिं येईल भगवंता ! ॥ २ ॥

—: ३ :—

**छत्तिस** वर्स पुढं चालवित महाराष्ट्राचा संसार। धर्माला उजळा बहु दिधला—फिरति नित्य दारोदार ! ॥ चैतन्य नवें





खेळु लागलें स्वतंत्र होण्या अनिवार । पिकलीं पानं टप् टप् गळलीं, धर्मवृक्ष धरि फळभार ॥ नौबत झडली, कडीं कडाडलीं, खड्ग करी रणिं कल्लोळ । 'रामदास-शिवराय' युगल हें होउनि गेलें बिनतोल ! ॥ धर्म मिळविला, देश मिळविला, दास्य बंध सत्वर तुटला । 'यवन बंड आडदांड बुडविलं,' हाच पवाडा जनिं केला ! ॥ चाल ॥ किती केला व्याप मठ किती स्थापन केला ॥ दीड हजार होते मठ, घेरलं साऱ्या देशाला ! ॥ आगगाडी मोटार नव्हती तेंवा जाण्याला ॥ पर पार्यी देशभर गेले, जोव कष्टविला ! ॥ चाल ॥ ठायीं ठायीं मग महंत ठेवुन, करुन जागृति धर्माची । शके सोळाशें तिसऱ्या वर्षी केली समाप्ती जन्माची ! ॥ ३ ॥

—: ४ :—

**समर्थांनीं** उपदेश केला । आपल्या शिष्यांला । तोच या काळा । आज आपणांला चतुर करणार । देशाला तेज तोच देणार । ऐका शाहीर तोच गाणार ॥ हरिकथा आर्षी निरुपण । राजकारण । सावधानपण । सर्व विषयांच्या ठायीं अनिवार । हेंच स्वराज्याचं दार छानदार । बंधुनों ! स्मरा त्यांचे उपकार ! ॥ बोलावें तसें चालावें । करावें करवावें ।

धरावें धरवावें । भजनमार्गाला लोक वश खास । जोडावी मनं धरावा विश्वास । परीक्षावं नीट साऱ्या लोकांस ॥ चाल ॥ मध जसा गोड तसं सदा गोड बोलावं ॥ एके जागीं राहूं नये, सदा दूर हिंडावं ॥ भिक्षामिषें लहान थोर पारखून सोडाव ॥ विवेकाला मित्र बनवावं । यत्नाला कधिं न सोडावं । आळसाला दूर लोटावं । उदासीन कधीं न राहावं । क्षण एक जगणं कीर्तिनं बरं समजावं ॥ वैराग्य अंगिं राखावं । चैनिचं घरटं जाळावं । निस्पृह सदा राहावं । महंतानं क्षमाशील शांत सदा जनिं व्हावं ॥ उपकार करून कितिकांचं चित्त जोडावं ॥ कामक्रोधादिक सर्वही पार जिंकावं । असं सदा चित्तिं ठेवावं । मग स्वातंत्र्य येइल चालून, सूख भोगावं ॥ चाल ॥ आज काळ कठिण बहु आला । हिंद देशाला । गेलं विलयाला । सारं तेज, झाला गरीब सगळा । हिंदु सारा झाला दीन दुबळा । म्हणुन आठवावं समर्थांच्या बोला ॥ ४ ॥